स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 25–02–2013 रोजी दुपारी 01–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 13. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 2. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 3. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 472</u> :— जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत नागपूर शहराचे सांडपाणी निर्मिती, शुध्दीकरण व भविष्यकालीन योजनां बाबत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>प्रस्तावना :</u>

नागपूर शहराचे एकूण क्षेत्रफळ २१७.५६ चौ.कि.मी. असून २०११ ची लोकसंख्या २४.६७ लक्ष आहे. सन २०२६ मध्ये ही लोकसंख्या ४०.५१ लक्ष अपेक्षित आहे. मलनि:सारण योजना नागपूर शहराच्या प्राकृतिक पातळीवर (Topogaphy नुसार) तीन प्रमुख भागात विभाजीत करण्यात आलेली आहे.

- उत्तर सिवरेज झोन : उत्तर—पश्चिम व पूर्व नागपूरचा भाग
- मध्य सिवरेज झोन : नागपूरचा मध्य भाग
- दक्षिण सिवरेज झोन : पश्चिम दक्षिण भाग

<u>सांडपाणी निर्मिती व शुध्दीकरण</u> :

नागपूर शहराचा पाणी पुरवठा **CPHEEO** च्या मापदंडानूसार **(Design Criteria for Water Supply)** प्रमाणे १५० लिटर प्रती व्यक्ति प्रति दिन आहे. त्यामधून १२० लिटर प्रती व्यक्ति प्रति दिन सांडपाण्याची निर्मिती होते व यात ५ टक्के जमिनीतील पावसाचे मुरलेले पाणी गृहीत धरुन एकूण १२६ लिटर प्रती व्यक्ति प्रति दिन सांडपाण्याची निर्मिती होते. त्यानुसार उत्तर, मध्य व दक्षिण सिवरेज झोन अंतर्गत भविष्यातील लोकससंख्येमध्ये होणारी वाढ गृहीत धरुन खालील तक्त्याप्रमाणे झोननिहाय सांडपाण्याची निर्मिती होईल.

| Projected Year | North Sewerage Zone | Central Sewerage Zone | South Sewerage Zone | Total Sewage Generation in Nagpur City (MLD) |
|---|---|---|---|---|
| | Sewage (MLD) | Sewage (MLD) | Sewage (MLD) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 2011 | 117.44 | 142.55 | 85.40 | 345.39 |
| 2026 | 185.39 | 189.50 | 135.63 | 510.52 |

सद्यस्थितीत नागपूर शहरात दररोज अंदाजे ३४५ द.ल.लि. सांडपाण्याची निर्मिती होते. मध्य नागपूर हा दाट लोकवस्ती असलेला भाग असून त्याकरिता भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे. या भागातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या शुध्दीकरणाकरिता भांडेवाडी येथे मलशुध्दीकरण केन्द्र बांधण्यात आले असून तेथे ७०—८० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याचे शुध्दीकरण होते. म्हणजेच २६५ द. ल. लि. सांडपाणी पिवळीनदी व नागनदीत सोडावे लागते.

उपरोक्त झोन्स् मधील अंदाजे ७०% टक्के भाग हा सिवरेज नेटवर्कद्वारे व्यापलेला आहे. नागपूर शहरातील सिवर लाईनची लांबी अंदाजे १६७० कि.मी. इतकी असून व्यास १५० मी.मी. ते १८०० मी.मी. इतका आहे.

## वर्ष २०२६ पर्यंत निर्मित होणारे झोननिहाय प्रस्तावित मलनि:सारण केन्द्र :

| ( 2011-2026 ) | North | Central | South |
|---|---|---|---|
| | 2 | 1 * | 1 |

* १३० द.ल.लि. क्षमतेच्या मलनि:सारण केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

## भविष्यातील सिवरेज झोननिहाय सांडपाण्याची निर्मिती, मलनि:सारण केन्द्र, मलवाहीन्या व जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत वित्तीय स्वरुप पुढीलप्रमाणे राहील :

वर्ष २०२६ नुसार संपूर्ण १००% मलजल प्रणाली तयार करण्यावर मनपाचा भर आहे. यात मलजल एकत्रित करणे, वहन करणे व प्रक्रिया करणे याचा समावेश राहील.

| Particulars | North Sewerage Zone | Central Sewerage Zone | South Sewerage Zone | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| Sewage Generated in 2011 | 117.44 Mld | 142.55 Mld | 85.40 Mld | 345.39 Mld |
| Sewage Generated in 2026 | 185.39 Mld | 189.50 Mld | 135.63 Mld | 510.52 Mld |
| Existing STP capacity | 0 | 80 Mld | 0 | 80 Mld |
| Already approved STP | 0 | 130 Mld | 0 | 130 Mld |
| Proposed STP capacity | 200 Mld | 0 | 150 Mld | 350 Mld |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| STP Plants Proposed | 2 | 0 | 1 | 3 |
| Sewerage System | 885.72 Kms. | 427.59 Kms. | 434.02 Kms. | 1747.38 Kms. |
| Estimated cost of STP | Rs. 188.78 Crs. | 0 | Rs. 78.66 Crs. | Rs. 267.44 Crs. |
| Estimated cost of Sewerage | Rs. 425.47 Crs. | Rs. 370.30 Crs. | Rs. 265.67 Crs. | Rs. 1061.44 Crs. |
| Estimated cost of STP & Sewerage System | Rs. 614.25 Crs. | Rs. 370.30 Crs. | Rs. 344.33 Crs. | Rs. 1328.88 Crs. |
| GOI (50%) | Rs.307.13 Crs. | Rs. 185.16 Crs. | Rs. 172.17 Crs. | Rs. 664.46 Crs. |
| GOM (20%) | Rs. 122.85 Crs. | Rs. 74.06 Crs. | Rs. 68.87 Crs. | Rs. 265.78 Crs. |
| NMC | Rs. 155.36 Crs. | Rs. 93.64 Crs. | Rs. 80.20 Crs. | Rs. 329.20 Crs. |
| NIT | Rs. 28.92 Crs. | Rs. 17.48 Crs. | Rs. 23.10 Crs. | Rs. 69.50 Crs. |

* मलजल वाहीन्यांचा व्यास १५० ते २६०० मि.मी. इतका असेल.

**सारांश :**

- सद्यस्थितीत नागपूर शहरात ३४५ द.ल.लि सांडपाण्याची निर्मिती होते.
- महानगरपालिका सध्या ७० ते ८० द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करीत आहे.
- जेएनएनयुआरएम अंतर्गत तसेच मनपा व महाजेनको यांचे दरम्यान झालेल्या करारानूसार डिसेंबर २०१३ मध्ये १३० द.ल.लि. मलनि:सारण केन्द्र पूर्ण होईल.
- सन २०२६ चे सांडपाणी निर्मिती ५१० द. ल. लि. अपेक्षित आहे.
- उत्तर, मध्य व दक्षिण सिवरेज झोनमध्ये अनुक्रमे २, ०, व १, एकूण ३ मलनि:सारण केन्द्र बांधावे लागतील.
- ३ मलनि:सारण केन्द्र राखीव जागेत बांधण्यात येतील.
- उपरोक्त सिवरेज झोन्समध्ये १७४७.३८ कि.मी. सिवर लाईन्सचा समावेश आहे (१५० ते २६०० मि. मी. व्यास).
- उपरोक्त कामांना रु. १३२८.८८ कोटी खर्च अपेक्षित आहे (२०११ ते २०२६ करीता).
- केन्द्र शासनाचा हिस्सा रु. ६६४.४६ कोटी, राज्य शासनाचा हिस्सा रु. २६५.७८ कोटी, मनपाचा हिस्सा रु. ३२९.२० कोटी, नासुप्रचा हिस्सा रु. ६९.५० कोटी इतका राहील.
- गोसीखुर्द जलाशयात होणारे जलप्रदुषण कमी करण्यास मदत होईल.

**प्रस्ताव :**

१. पुढील विस्तृत प्रकल्प अहवालास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

अ) उत्तर सिवरेज झोन — रु. ६१४.२५ कोटी

ब) मध्य सिवरेज झोन — रु. ३७०.३० कोटी

| | | | |
|---|---|---|---|
| क) | दक्षिण सिवरेज झोन | — | रु. ३४४.३३ कोटी |
| | **एकूण** | — | **रु. १३२८.८८ कोटी** |

२. जेएनएनयुआरएम अंतर्गत पुढील वित्तीय व्यवस्थेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

(रु. कोटीमध्ये)

| वित्तीय वाटा → / ↓ सिवरेज झोन | प्राकलनीय राशी | केन्द्र शासनाचा हिस्सा (५०%) | राज्य शासनाचा हिस्सा (२०%) | मनपाचा हिस्सा | नासुप्रचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर सिवरेज झोन | ६१४.२५ | ३०७.१३ | १२२.८५ | १५५.३६ | २८.९२ |
| मध्य सिवरेज झोन | ३७०.३० | १८५.१६ | ७४.०६ | ९३.६४ | १७.४८ |
| दक्षिण सिवरेज झोन | ३४४.३३ | १७२.१७ | ६८.८७ | ८०.२० | २३.१० |
| **एकूण** | **१३२८.८८** | **६६४.४६** | **२६५.७८** | **३२९.२०** | **६९.५०** |

३. रु. ३२९.२० कोटी चे कर्ज उभारणीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

उपरोक्त प्रस्ताव अनु. क्र. १, २ व ३ मंजूरी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 473</u> :— स्थायी समिती ठराव क्र. 220 दि. 10.12.2012 अन्वये रुपये 29,75,000/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी नुसार वाहतुक पोलीसांचे दक्षीण आणि पुर्व झोन अंतर्गत येणारे रस्ते/बाजार परिसरात हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरीयल नी पार्कींक पट्टयाची मार्कीक करण्या करीता प्राप्त मे. अमर इन्टरप्राईजेस यांची 1.00 टक्केनी कमी दराची रुपये 29,45,250/— ची ई—निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 474</u> :— नागपूर महानगरपालिका, अग्निशामक विभागाच्या कामाकरीता खालील 8 वाहन चालकांची कंत्राटी पध्दतीवर कार्यालयीन आदेश क्र. 37/जा.श्रवि दि. 26.09.2008 अन्वये नियुक्ती करण्यांत आलेली असुन त्यांना कार्यालयीन आदेश क्र. 92/जा/श्रवी दि. 26.11.2012 अन्वये तीन

महिन्यांकरीता दरमहा रु. 8500/– एकमुस्त मानधनावर मुदतवाढ देण्यांत आली होती. ती मुदतवाढ दि. 10.01.2013 ला संपूष्टात आलेली असुन खालील 8 वाहन चालकांना एक दिवसाचा तांत्रीक खंड देवून दि. 12.01.2013 ते 11.07.2013 पर्यंत दरमहा रु. 8500/– या एकमुस्त मानधनावर मुदतवाढ देण्यांचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव |
|---|---|
| 1. | श्री. महेश गजाननराव आसरे |
| 2. | श्री. विनोद भाऊराव खंडाळे |
| 3. | श्री. फ्रांन्सीस व्हिक्टर दुपारे |
| 4. | श्री. कृपाशंकर रामनरेशजी दिक्षीत |
| 5. | श्री. सुनिल गणपतराव समरीत |
| 6. | श्री. दिनेश महादेवराव खडसे |
| 7. | श्री. अमजद जाफरउल्लाखान पठाण |
| 8. | श्री. विक्रम चंद्रशेखर जाधव |

<u>ठराव क्रमांक 475</u> :– श्री. एम.एस. केळवदकर, सेवानिवृत्त तहसिलदार हयांची कार्यालयीन आदेश क्र. 67/ओ.ॲन्ड.एम. दि. 14.06.2012 अन्वये कंत्राटी पध्दतीवर विशेष कार्य अधिकारी (चौकशी) नियुक्तीचा कालावधी दि. 13. 12.2012 रोजी संपुष्टात आलेला असल्यामुळे त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. 15.12.2012 पासून पुढील 6 महिन्याकरिता, दरमहा रु. 10,000/– या एकमुस्त मानधनावर नियुक्ती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 476</u> :– प्रभाग क्र. 53 अ व ब येथील बाजीप्रभु नगर व गोकुलपेठ येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मे. आर.एम. गोपलानी यांची न्युनतम दरावरील रु. 29,61,710/– ची प्राकलनीय राशीपेक्षा 1.21 टक्के कमी दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. स्थायी समिती ठराव क्र. 352 दि. 02.02.2013 अन्वये या कामास प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.
2. या कामाचा खर्च पद क्र. 682 अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 477</u> :– धंतोली झोन क्र. 4 अंतर्गत प्रभाग क्र. 50 मधील रामबाग टिम्बर मार्केट व प्रभाग क्र. 27 गांधीसागर मधील मॉडेल मील व गणेशपेठ भागात स्ट्रीट लाईट फेज टकाण्याकरीता एम. एस. इ. डि. सी. एल. कडुन रु. 2,09,705/– रुपयाचे मागणीपत्र प्राप्त झाले असुन पद क्र. 719 अंतर्गत सन

2012—13 करीता रु. 02.00 लक्ष तरतुद असल्यामुळे उर्वरीत राशी पद क्र. 327 मधुन पद क्र. 719 मध्ये वळते करण्याच्या प्रस्तावास प्रभाग समिती ठराव क्र. 61 दि. 31.12. 2012 रोजी मंजुर करुन अंतीम मंजुरीस्तव शिफारशीसह मा. स्थायी समितीकडे पाठविण्यास एकमताने मंजुरी प्रदान करण्यात आली सदर प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावात पद क्र. 619 ऐवजी पद क्रमांक 719 आणी पद क्रमांक 714 ऐवजी पद क्रमांक 719 अशी दुरुस्ती कार्यालयाने सुचविल्या प्रमाणे दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

रु. 9705 इतकी राशी पद क्र. 327 मधुन पद क्र. 719 मध्ये वळते केल्यानंतर दोन्ही पदा अंतर्गत उपलब्ध प्रावधानी स्थीती खालील प्रमाणे राहील.

| अनु. क्र. | पद क्र. | एकूण प्रभाग समिती तर्फे मंजुर तरतुद (लाखात) | वाढ / घट | एकूण प्रभाग समितीतर्फे प्रस्तावित तरतुद |
|---|---|---|---|---|
| 1 | 719 | 2.00 | 0.10 (+) | 2.10 |
| 2 | 327 | 20.00 | 0.10 (—) | 19.90 |

++ ++ ++

<u>ठराव क्रमांक 478</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर